*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# महिला आणि मी – टू – चळवळ

डॉ. सौ. श्रध्दा विनोद कोठावळे

राज्यशास्त्र विभागप्रमुख, सहकारभूषण एस. के. पाटील महाविदयालय, कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

…………………………………………………………………………………………………………………………...

**प्रस्तावना-**

आज 21 व्या शतकात प्रवेश केल्यानंतर स्त्री मुक्ती, स्त्री पुरुष समानता, स्त्री शक्ती या संकल्पना आपणास नव्या नाहित, या संकल्पना रुजू लागलेल्या आहेत. स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्रियांचे सक्षमीकरण / सबलीकरण स्वयंसेवी संस्था, स्त्रियांसाठी आरक्षण हे विषय परिचयाचे झाले आहेत. त्यावर अनेकदा चर्चाही होताना दिसते. मात्र ही चर्चा युनोने 1975 हे साल आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित केल्यानंतरच वाढली त्यानंतर 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून गणले गेले. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात सबलीकरणावर चर्चा होऊ लागली.

आधुनिक काळात प्रगत समाज म्हणजे ज्या समाजात केवळ भौतिक संसाधने आर्थिक उन्नती श्रीमंती यामध्ये वाढ झालेली आहे. असे नसून ज्या समाजात सर्व मानवी संसाधनाचा ही प्रगती करण्यामध्ये समान संधी तसेच समान वाटा मिळतो. अशा समाजाला प्रगत समाज म्हंटले जाते. कोणत्याही समाजाच्या चिरंतन सामाजिक व आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व घटकांचा समावेश असला पाहिजे. या दृष्टीने शाश्वत विकासासाठी स्त्रियांना बरोबरीने विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेतले पाहिजे. [1]

**महिला सबलीकरण –**

सबलीकरण ही संकल्पना अत्यंत महत्वाची व आवश्यक आहे. महिलांचे सबलीकरण ही बहुआयामी व बहुमुखी वैशिष्टये असणारी प्रक्रिया आहे. सर्व पातळीवर महिलांचा विकास होण्याशी निगडीत अशी ही कल्पना आहे. अस्तित्वात असणाऱ्या भौतिक आणि मानवी संसाधनावर नियंत्रण ठेवणे, त्यामध्ये वाटा मिळविणे हे महिला सबलीकरणामध्ये महत्वाचे सूत्र आहे. [2]

प्रस्तुत शोधनिबंधात महिला सशक्तीकरण, महिला विकास ते आज चर्चेत असणाऱ्या मी – टू ते यू – टू चळवळ या विषयावर चर्चा करण्यात येत आहे.

लोपेझ आणि झहिदी यांनी महिला सबलीकरण मोजमापासाठी खालील पाच महत्वाचे निर्देश सांगितले आहे.

1) आर्थिक निर्देश – यामध्ये महिलाना काम करण्याची मिळणारी संधी, आर्थिक स्थिती यांचा समावेश होतो.
2) शैक्षणिक निर्देश – यामध्ये शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण साक्षरता, शिक्षण मिळण्याची संधी इ.
3) आरोग्य निर्देश – बाल, जन्म-मृत्यू दर,स्त्रियांच्या प्रस्तुतीची सुरक्षा, स्त्रियांचे आरोग्य माता बाल संगोपन इ.
4) लोकसंख्या निर्देश – स्त्रियांचे लोकसंख्येमधील प्रमाण, स्त्री – जनन दर, स्त्रियांवरील होणारे अन्याय अत्याचार व हिंसा इ.
5) राजकीय निर्देश – महिलांचे मतदानाचे प्रभाग, निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग

एकंदरीत महिलांचे सबलीकरण होण्यासाठी वरील सर्व निर्देशांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे. [3] ही प्रक्रिया संथ गतीने होत असली तरी आशादायी आहे.

स्त्रियांना आदराचे स्थान असले म्हणजे त्यांना समाज व्यवस्थेत अधिकार आणि सत्तारचनेत निर्णायक महत्वाचे स्थान असतेच असे मात्र नाही. पुरुषप्रधान संस्कृतीच्या आणि समाजरचनेच्या चौकटीत भारतीय इतिहास घडत गेल्यामुळे त्यांचे प्रत्यंतर आपल्याला वारंवार येते.[4] स्त्री शक्ती आणि स्त्री पुरुष समानतेचा विचार करताना आपण इतिहासाकडे जेव्हा वळतो, त्यावेळी प्रत्येक इतिहास कालखंडात नेहमीच पुरुषप्रधानतेला मान्यता देणारी समाजरचनाच कशी सातत्याने टिकविली गेली हे लक्षात येते. त्यासाठी विवाह कुटूंब, कूल, गोत्र, नातेसंबंधाचे जाळे यांना भक्कम संस्थात्मक रुपही दिले गेले. मात्र त्यातील मानवी व्यवहारांचे नीट विश्लेषण केल्यास कुटूंबापासून ते राज्य संस्थेपर्यंत सर्वत्रच स्त्रियांचे श्रम, मग त्याचा मोबदला मिळणारे कष्ट असोत, अथवा विनामोबदल्यात केलेले काम असो, त्यावर त्यातून मिळणाऱ्या उत्पादनावर आणि विशेषत: स्त्रियांच्या लैंगिक जीवनावरही पूर्णपणे नियंत्रण ठेवण्याची पुरुषप्रधानतेला पोषक अशी व्यवस्था निर्माण केली गेली होती हे स्पष्ट दिसते आणि त्यासाठी पुरुषप्रधान समाजरचनेने धर्म संकल्पनांचा,सांस्कृतिक परंपरांचा आणि

प्रतिमांचा पध्दतशीर वापर करुन घेतला हे नियंत्रण कायम रहावे. यासाठी गरज पडल्यास बळजबरी आणि हिंसात्मक मार्गही अवलंबिल्याचे दिसून येते. [5]

ऐतिहासिक कालखंडात उत्पादनपध्दती साधने बदलेली राज्यसंस्थेच्या जडणघडणीचे स्वरुप बदलत गेले, तरीही घर कुटूंब आणि त्याच्या संपत्तीवर संपूर्ण वर्चस्व हे पुरुषांचेच राहील.

स्त्री – चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवून देण्याचा संघटित प्रयत्न आहे. [6] स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरुध्द, शारिरिक शोषणाविरुध्द मी – टू चळवळीच्या माध्यमातून वाचा फोडली जातीय. हेच आपणास दिसून येते.

**मी – टू चळवळ –**

मी – टू मोहिम ही विविध क्षेत्रात, कार्यालयीन वातावरणात अथवा कामाच्या ठिकाणी विशेषत: महिलांवरील होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरोधात प्रथम ट्विटरद्वारे # मी – टू असा हॅशटॅग वापरुन आवाज उठविण्यासाठी सुरु झालेली चळवळ आहे. आणि संपूर्ण जगभर ही चळवळ सुरु आहे.[7]

2006 साली अमेरिकेत मानवअधिकार कार्यकर्ती तराना बर्क या महिलेने या प्रश्नाला वाचा फोडली. त्यांनी जस्ट बी (Just Be) या ना – नफा या संस्थेची स्थापना केली. लैंगिक अत्याचाराची आणि हिंसेची बळी ठरलेल्या स्त्रियांच्या मदतीसाठी ही संस्था काम करते. तराना यांनी या चळवळीला मी – टू नाव दिले. [8] 16 ऑक्टोंबर 2017 रोजी अलिसा मिलानो या अभिनेत्रीने ट्विटर संकेतस्थळावर # Me too हा हॅशटॅग वापरुन चित्रपट सृष्टीमध्ये होणाऱ्या लैंगिक शोषणाविरुध्द वाचा फोडली आणि तिने अन्यायाविरुध्द वाचा फोडण्यासाठी अभिनेत्री आणि सामान्य स्त्रियांना आवाहन केले. एका दिवसात 40,000/- लोकांनी, ज्यात बहुतांशी स्त्रिया होत्या # मी – टू हा हॅशटॅग वापरुन आपल्या कहाण्या कथन केल्या व न्याय मागितला.[9] 18 ऑक्टोंबर 2017 ला ऑलिम्पिक जिमनॅस्टिक्स खेळाडू मॅकायला मरोनी हिने अमेरिकन जिमनॅस्टिक्स खेळाडू मॅकायला मरोनी हिने अमेरिकन जिमनॅस्टिक्स टीमचे डॉक्टर लॅरी. नाझर यांच्याविरुध्द लैंगिक शोषणाला वाचा फोडली. 29 ऑक्टोंबर 2017 ऍन्थनी रॅप याने केव्हिन स्पेसी या ऑस्कर पारितोषिक प्राप्त अभिनेत्याविरुध्द शोषणाचे आरोप केले. यानंतर अनेक व्यवसायातील बड्या धनदांडग्यांनी केलेल्या लैंगिक शोषणाचा बळी ठरलेल्या स्त्री पुरुषांनी आवाज उठविला अनेक प्रकरणात स्टुडिओ आणि कंपन्यांना अशा लोकांविरुध्द कारवाई करावी लागली. [10]

अमेरिकेत क्रिडाविषयक क्षेत्रात कॉस्बीकडून अँड्रिया वरती अशीच बळजबरी झाली. अँड्रियाच्या म्हणण्याला दुजोरा देण्यासाठी मी – टू मोहिम ही हॉलिवूडच्या अनेक प्रख्यात अभिनेत्री अमेरिकन टेलीव्हिजनवरील लोकप्रिय महिला अँकर आणि समाजातल्या प्रतिष्ठित महिलांच्या पुढाकाराने चाललेली वर्तमानातील अतिशय महत्वाची मोहिम ठरली आहे. हा # (हॅश) टॅग जणू स्त्री सन्मानाच्या संघर्षाची खूण बनला. जाहीर कार्यक्रमात टेलीव्हिजनच्या शो च्या निमित्ताने हॉलिवूड आणि अन्य क्षेत्रातीलही कास्टिंग काऊचला वाचा फुटली. अंगी कर्तृत्व आणि प्रतिभा असूनही बाईपणाची किंमत चुकवलेली असूनही मानहानीच्या किंवा पुढे जाण्याच्या संधी कायमच्या हुकतील या भीतीपोटी गप्प बसणाऱ्यात प्रख्यात नामवंत महिलांचाही समावेश असतो आणि तो ही प्रगत आणि उदारमतवादी समजल्या जाणाऱ्या अमेरिकन समाजाला ही कटू वस्तुस्थिती संघर्षाच्या वास्तवात बदलणाऱ्या या मोहिमेने ज्यांच्या वाट्याला असे घृणास्पद अपमान आले अशा स्त्रियांना मी ही बळी ठरले होते असे जाहिर बोलण्याचे बळ देते. ऍंड्रियाच्या मागे 60 महिलांनी आपल्या तक्रारी नोंदवल्या तेव्ही झगमगाटी आणि प्रतिष्ठीत आवरणाखाली चालणाऱ्या ला लैंगिक शोषणाने किती व्यापक प्रमाणावर आणि खोलवर हातपाय पसरलेत हे उघड झाले अनेकांची नावे पाहून तर 'यू टू ?' असे आश्चर्यजनक उदगार बाहेर पडले. [11]

**भारतातील मी – टू चळवळ** –

2019 ची स्थिती एका वर्षात भारतातील मी – टू चळवळ मरणासन्न झाली. नाना पाटेकर, गौरांग दोशी, विकास बहल, सुभाष कपुर, अन्नु मलिक, साजिद खान, सुभाष घई, कैलाश खैर, राजकुमार हिरानी, विनोद दुआ, एम. जे. अकबर, आलोकनाथ, रजत कपूर वगैरेंना मी – टू चळवळ जेव्हा जोरात होती तेव्हा काही कामे मिळत नव्हती ती मिळणे सुरु झाले. [12]

भारतासारख्या बलाढ्य लोकशाही देशात ज्या मोठ्या व्यक्तिंची नावे आली त्यावर सोयीस्करपणे पांघरुण घातले गेले. कारण बाईत्व जखडून ठेवण्याचे काम पुरुषप्रधान व्यवस्था करित असते. जात संस्था त्याच उतरंडीमध्ये ठेवण्याचे काम करते. संरजामी मूल्ये जपण्याचा प्रयत्न करताना स्त्रिया बळी ठरतात. येथे श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्वाची स्पर्धा चालू असते. स्त्रियांची कोंडी केली जाते. दबाव वाढला जातो. मी – टू अंतर्गत घडणाऱ्या घटनांना ती बळी पडते आणि

जागतिकीकरणामध्ये स्त्रीला तिच्या शारिराची जाणीव करुन दिली जाते. सूचक शेरे मारले जातात. म्हणूनच विशाखा आदेशानुसार लैंगिक छळ प्रतिबंधक समितीची स्थापना केली जाते आणि कामाच्या ठिकाणी महिलांना सार्वजनिक अभय देण्याचा प्रयत्न केला जातो. IT क्षेत्रात आज प्रचंड प्रमाणात हिंसाचार वाढला आहे. घरातही हिंसाचार आहे. [13]

**सारांश –**

मी – टू म्हणजे लैंगिक छळ किंवा हिंसा असे न म्हणता मी – टू म्हणजे स्त्री ची स्वत:ची ओळख शोधण्याची धडपड. प्रतिष्ठेने मला जगायला मिळाले पाहिजे. सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगणे हा लोकशाहीचा गाभा आहे. यासाठी सार्वजनिक नीतीमत्ता वाटली पाहिजे. स्वातंत्र्य, समानता, न्याय, प्रतिष्ठा ही मूल्ले प्रत्येक व्यक्तित रुजली पाहिजेत. लोकशाही समाजातल्या प्रतिष्ठेचा विषय म्हणजेच मी – टू चळवळ, मी –टू चे यश म्हणजे स्त्रियांच्या बाबतीत झाकून टाकलेल्या अन्याय अत्याचार, लैंगिक छळ या गोष्टी उघडकीस आणल्या जाऊन स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे हेच आहे आणि सामाजिक मूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करुन देऊन सार्वजनिक नीतीमत्तेत वाढ करणे हे आहे.

**संदर्भ –**

1) भोळे भा. ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपरापुरे प्रकाशन 2003

2) चोरमारे विजय – स्त्री सत्तेची पहाट, 2003

3) https/www.oecd.org>dac PDF
https/www.researchgatNet2484

4) संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव - द.ना. धनागरे, प्रतिमा प्रकाशन पुणे, 2005 (उदात्तीकरणातून सक्षमीकरणाकडे स्त्री शक्ती आणि आजचे सामाजिक वास्तव आर्टिकल) पान नं. 2

5) संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव - द.ना. धनागरे, प्रतिमा प्रकाशन पुणे, 2005 (उदात्तीकरणातून सक्षमीकरणाकडे स्त्री शक्ती आणि आजचे सामाजिक वास्तव आर्टिकल) पान नं. 3

6) संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव - द.ना. धनागरे, प्रतिमा प्रकाशन पुणे, 2005 (उदात्तीकरणातून सक्षमीकरणाकडे स्त्री शक्ती आणि आजचे सामाजिक वास्तव आर्टिकल) पान नं. 24, 26

7) Harvey Weinstein Paid off sexual Harassment Accusers For Decades (en मजकूर) 2018-10-22 रोजी पाहिले.

8) The Women who created # Me too Lang Before Hashtags (en मजकूर) 2018-10-22 रोजी पाहिले.

9) The women who created # me too lang before Hashtags (en मजकूर) 2018-10-22

10) Ohlheiser, Abby. "Meet the women who coined 'Me Too' 10 years ago – to help women of color". Chicagotribun.com (en_US मजकूर) 2018-10-22 रोजी पाहिले.

11) Schonberg Harold C "For city Hall, # Me too Becomes # YouToo – The New Yark Times" The Editorial Board (en- US मजकूर) 2018-04-27 रोजी पाहिले.

12) i) "Vinta Nanda Files Police Complaint against Alok Nath". The Indian Express (en-US मजकूर). 2018-10-18, 28-10-22 रोजी पाहिले.
ii) Patel, Tushita. "MJ Akbar, Stop with the lying. You sexually harassed me too. Your threats will not silence us" Scroll.in (en-US मजकूर) 2018-10-22 रोजी पाहिले.
iii) Szpiner, Francis. "Woman behind French # Me Too' found guilty of defaming media executive" lawyer (en-US मजकूर) 2018-10-22 रोजी पाहिले.

13) स्त्रिया आणि लोकशाही - यू टयूब, व्याख्यान
डॉ श्रृती तांबे – समाजशास्त्र विभागप्रमुख सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ,पुणे